| वर्ष - 9 | अंक -19 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

गणपती बाप्पा मोरया

पुढच्या वर्षी लवकर या...!

www.mahaenews.com | शनिवार, दि. 6 सप्टेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## गणरायाला निरोप — मुंबई सज्ज – विसर्जनासाठी कडेकोट सुरक्षा

# निरोप घेतो देवा आता आज्ञा असावी!

## अनंत चतुर्दशी निमित्त 1.5 लाखांहून अधिक गणेशमूर्तींचं विसर्जन;

| मुंबई | प्रतिनिधी |
महाईन्यूज

भजन, आरती, भाविकांच्या दर्शनासाठी रांगा अन् शिगेला पोहोचलेला उत्साह, आनंद असा माहोल गणेशोत्सवकाळात अनुभवल्यानंतर आज, शनिवारी गणरायांना भावपूर्ण वातावरणात निरोप दिला जाणार आहे. सार्वजनिक मंडळांसह, घरगुती गणपतींच्या विसर्जन मिरवणुकांचा जोर सर्वत्र असणार आहे. यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी जय्यत तयारी केली आहे. गणेशोत्सवाच्या आधीपासूनच मुंबईत आनंद टीपेला पोहोचला होता. गणेशमूर्तींच्या आगमन मिरवणुकांत शहर रंगले होते. आता येथे उत्साह असेल, तो विसर्जन मिरवणुकांचा. शनिवारी सकाळपासूनच मिरवणुकांना सुरुवात होईल. सर्व भाविकांचे आकर्षण असलेले लालबागचा राजा आणि 'मुंबईचा राजा'ची मिरवणूक सकाळी आठ वाजता सुरू होणार आहे. पर्यावरणपूरक गणेशोत्सवासाठी ओळखला जाणारा 'राजा तेजुकायाचा'च्या विसर्जन मिरवणुकीस सकाळी ७ वाजता पारंपरिक पद्धतीने प्रारंभ होईल.





या गणरायाचा रथ दुपारी चिंचपोकळी येथे पोहोचल्यावर भाविकांकडून महाआरती होणार आहे, अशी माहिती मंडळाचे सदस्य सुशांत शिंदे यांनी दिली. तसेच 'चिंचपोकळीचा चिंतामणी'च्या संपूर्ण विसर्जन मिरवणुकीत आरतीचे सूर ऐकू येणार आहेत. उपनगरातील विसर्जन मिरवणुका दुपारनंतर सुरू होणार आहेत. दादर चौपाटी, वर्सोवा चौपाटी येथे संध्याकाळी उशिरा त्या विभागातील गणेशमूर्ती विसर्जनासाठी पोहोचतील. दरम्यान, पांढऱ्या रंगाचे सदरे, ओढण्या आणि फेटे घेण्यासाठी लालबाग, परळ परिसरात ग्राहकांची लगबग सुरू होती.

### गिरगावमध्ये सुयोग्य नियोजन

गिरगावमधील खेतवाडी विभागातील मंडळांकडून विसर्जनासाठी सुयोग्य नियोजन करण्यात आले आहे. 'सर्व गल्ल्यांमधील गणपती विसर्जन मिरवणुका सकाळी १० ते ११च्या सुमारास सुरू होणार आहेत. मंडळांकडून विसर्जनासाठी विशेष सुरक्षिततेची काळजी घेतली जाते,' असे माहिती 'खेतवाडीचा महागणपती' मंडळाचे सभासद इमॅन्युएल कारभारी यांनी दिली.

### पुढील वर्षी गणरायांचे १४ सप्टेंबरला आगमन

ठाणे : गणेशमूर्ती विसर्जनाच्यावेळी 'गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या !' असा गजर गणेशभक्त करत असतात. परंतु पुढील वर्षी ज्येष्ठ अधिकमास येणार असल्याने गणरायाचे आगमन १८ दिवस उशिरा, म्हणजे १४ सप्टेंबर २०२६ रोजी होणार आहे, अशी माहिती पंचांगकर्ते दा. कृ. सोमण यांनी दिली. सुरक्षेसाठी CCTV व ड्रोनसह पहिल्यांदाच AI चाही वापर होणार Shareउद्या (6 सप्टेंबर) अनंत चतुर्दशी आहे. उद्या मुंबईसह संपूर्ण देशात गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात येणार आहे.

या काळात मुंबई पोलिसांकडून सुरक्षेची खास खबरदारी घेण्यात येत आली. मुंबईत हजारो पोलिस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची तैणात करण्यात आली आहे. मुंबईतील विविध ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे आणि एआयच्या माध्यमातून नजर ठेवली जाणार आहे. उद्या शहरातील अनेक रस्ते बंद ठेवण्यात आले आहेत.

### 1 ते दीड लाख गणेश मूर्तींचं विसर्जन होणार

मुंबईतील सुरक्षा व्यवस्थेबाबत मुंबई पोलिसांनी पत्रकार परिषद घेत माहिती दिली. कायदा आणि सुव्यवस्था विभागाचे सहपोलीस आयुक्त सत्यनारायण चौधरी यांनी म्हटले की, उद्या अनंत चतुर्दशीनिमित्त होणाऱ्या विसर्जनाच्या अनुषंगाने मुंबई पोलिसांनी तयारी केलेली आहे. हा उत्सव राज्योत्सव म्हणून सरकारने घोषित केलेला आहे. उद्या 6 हजार 500 सार्वजनिक गणेश मूर्तींचं आणि जवळपास एक ते दीड लाख घरगुती मूर्तींचे विसर्जन आहे.

### हजारो अधिकारी-कर्मचारी तैणात

गणेश विसर्जानासाठी 12 अतिरिक्त पोलीस आयुक्त, 40 डीसीपी आणि 61 एसीपी सोबतच 3 हजार अधिकारी आणि 18 हजार कर्मचारी, 14 एसआरपीएफ आणि क्यूआरटी पथके तैणात आहेत. 10 हजार सीसीटीव्ही कॅमेरे आणि ड्रोनच्या माध्यमातून नागरिकांवर लक्ष ठेवले जाणार आहे. तसेच एआय कॅमेऱ्यांच्या माध्यमातूनही लक्ष ठेवले जाणार आहे. बिट मार्शल, निर्भया पथक आणि साध्या वेधातले पोलिसही तैनात असणार आहेत.

## गृहराज्यमंत्री योगेश कदम काय म्हणाले?

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी याबाबत म्हटले की, आजपर्यंत गणेशोत्सवाला कधीच बाप्पाच्या कृपेनं गालबोट लागलेलं नाही. मुख्यमंत्र्यांनीही याबाबच आढावा बैठक घेतली होती. यंदा सुरक्षेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आपण केला आहे. सेन्सेटिव्ह भागात आपण एआयचा वापर केला आहे. अनेक ठिकाणी पोलिस कर्मचारी तैणात करण्यात आले आहेत. मुंबई पोलिसांना धमकी मिळाली होती, यावर बोलताना कदम म्हणाले की, मुंबई पोलीस अलर्ट असतात, आपली इंटेलिजन्स ॲक्टीव्ह आहे. सोर्स शोधणं सुरु आहे, घाबरुन जाण्याचं कारण नाही.

तयारी विसर्जनाची...

## सकाळी साडेनऊ वाजण्याची सर्वांना प्रतीक्षा

# गणेशोत्सवाच्या सोहळ्याची सांगता!

## विसर्जन मिरवणुकीची तयारी पूर्ण

।पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्रद्धा आणि भक्तिभावाने भारलेल्या गणेशोत्सवाच्या आनंद सोहळ्याची शनिवारी (६ सप्टेंबर) सांगता होणार आहे. ढोल-ताशांचा निनाद, बँडपथकांनी वाजविलेल्या मधुर सुरावटी आणि 'मंगलमूर्ती मोरया'चा गजर करीत लाडक्या गणरायाला वैभवशाली विसर्जन मिरवणुकीने निरोप देण्यासाठी सारे सज्ज झाले आहेत. मानाच्या आणि प्रमुख मंडळांची विसर्जन मिरवणुकीची तयारी पूर्ण झाली असून, सर्वांनाच शनिवारी सकाळी साडेनऊ वाजण्याची प्रतीक्षा आहे. विसर्जन मिरवणुकीतील सहभागावरून मंडळांमध्ये असलेला तिढा संवादातून सुटला असून, प्रत्यक्ष मिरवणूक कशी पार पडते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**



गणेश चतुर्थीला सुरू झालेल्या मंगलमय उत्सवाने संपूर्ण शहर गणरंगी रंगून गेले होते. दररोजची पूजा, आरती, अथर्वशीर्षपठण अशा धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक उपक्रमांनी उत्सवामध्ये रंग भरले गेले. दहा दिवसांमध्ये मानाच्या गणपती मंडळांसह प्रमुख गणेश मंडळांनी साकारलेले देखावे पाहण्याचा नागरिकांमध्ये उत्साह होता. या उत्सवाचा अनंत चतुर्दशीला निघणाऱ्या वैभवशाली विसर्जन मिरवणुकीने कळसाध्याय गाठला जाणार आहे. गणरायाला निरोप देताना डोळ्यांच्या कडा पाणावणार असल्या, तरी गणेशाच्या निरोप समारंभानिमित्त काढण्यात येणाऱ्या विसर्जन मिरवणुकीमध्ये कोणताही कसर राहू नये यासाठी कार्यकर्ते झटत आहेत.महात्मा फुले मंडई येथील लोकमान्य टिळक यांच्या पूर्णाकृती पुतळ्यासह मानाच्या गणपतींना पुष्पहार अर्पण करून आरती झाल्यानंतर सकाळी साडेनऊ वाजता विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ होणार आहे. श्री कसबा गणपती, श्री तांबडी जोगेश्वरी या ग्रामदैवतांच्या नावाने असलेल्या मंडळांच्या मिरवणुकीनंतर लक्ष्मी रस्त्यावर पहिल्यांदा गुलाल उधळणारे मंडळ असा लौकिक असलेल्या श्री गुरुजी तालीम मंडळाचा गणपती मार्गस्थ होईल. शतकोत्तर रौप्यमहोत्सव साजरा करणाऱ्या श्री तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळानंतर केसरीवाडा हा मानाचा पाचवा गणपती मार्गक्रमण करेल. प्रत्येक मंडळासमोर कोणते बँडपथक असणार, कोणती

### देखावे पाहण्याचा उत्साह होता

हवामान विभागाचे शास्त्रज्ञ एस. डी. सानप यांनी दिलेल्या माहितीनुसार, पावसाचे प्रमाण कमी होण्याची चिन्हे आहेत.गणेश चतुर्थीला सुरू झालेल्या मंगलमय उत्सवाने संपूर्ण शहर गणरंगी रंगून गेले होते. दररोजची पूजा, आरती, अथर्वशीर्षपठण अशा धार्मिक कार्यक्रमांसह सांस्कृतिक उपक्रमांनी उत्सवामध्ये रंग भरले गेले. दहा दिवसांमध्ये मानाच्या गणपती मंडळांसह प्रमुख गणेश मंडळांनी साकारलेले देखावे पाहण्याचा नागरिकांमध्ये उत्साह होता.

ढोल-ताशा पथके असतील आणि मिरवणूक कोणत्या चौकात किती वाजता पोहोचणार याचे काटेकोर नियोजन करण्यात आले आहे. पोलीस आणि महापालिका प्रशासन मिरवणुकीसाठी सज्ज झाले आहे. विसर्जन मिरवणुकीत कोणाला त्रास होऊ लागला, तर त्यावर उपचार करण्यासाठी आपत्कालीन वैद्यकीय मदत पथक तयार ठेवण्यात आले आहे. लक्ष्मी रस्ता, केळकर रस्ता, कुमठेकर रस्ता आणि टिळक रस्ता या मिरवणुकीच्या चारही प्रमुख मार्गांवर रुग्णवाहिका तैनात आहेत. विसर्जन मिरवणुकीसाठी आठ हजार पोलिसांचा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. लक्ष्मी रस्त्यावरील श्री गजानन मंडळाचे यंदा ८६ वे वर्ष असून, श्री गरुड गणपती मंडळाचे यंदा ८२ वे वर्ष आहे. विसर्जन मिरवणुकीला होणारा विलंब ध्यानात घेऊन या दोन्ही मंडळांनी संयुक्त मिरवणूक काढण्याचा निर्णय घेतला. या संयुक्त मिरवणुकीचे यंदा ११ वे वर्ष आहे. आज हलक्या सरींचा अंदाज गणपती विसर्जनासाठी शहरातील मंडळे, प्रशासनाने जय्यत तयारी केली आहे. शहरात उद्या (शनिवारी) हलक्या सरींची शक्यता वर्तवण्यात आली आहे. छत्तीसगडच्या परिसरात निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्रामुळे गेले दोन दिवस राज्यभरात ठिकठिकाणी मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला होता. मात्र, या कमी दाबाच्या क्षेत्राची तीव्रता कमी झाली आहे.

# ऐन गणेशोत्सवात पुण्यात गँगवॉर

## आंदेकर खून प्रकरणातील आरोपीच्या मुलाची गोळ्या घालून हत्या

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**ऐन गणेशोत्सवात पुण्यात टोळी युद्धाचा भडका उडाला आहे. माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्या खुनाचा बदला घेण्यासाठी या खून प्रकरणातील आरोपी गणेश कुमकरचा मुलगा गोविंद कोमकर याचा शुक्रवारी संध्याकाळी नाना पेठ येथे गोळ्या घालून खून करण्यात आला. नाना पेठेतील हमाल तालीमजवळ एका इमारतीच्या पार्किंगमध्ये गोविंद याच्यावर पिस्तुलातून चार गोळ्या झाडण्यात आला. त्यात तो मृत्युमुखी पडला.**



वर्चस्ववादातून गेल्यावर्षी एक सप्टेंबर रोजी माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांच्यावर पिस्तुलातून गोळीबार करून तसेच कोयत्याने वार करून खून करण्यात आला होता. या प्रकरणात सोमनाथ गायकवाड, अनिरुद्ध दूधभाते, वनराज आंदकर यांची बहीण संजीवनी कोमकर, जयंत कोमकर आणि गणेश कोमकर यांच्यासह १६ आरोपींना अटक करण्यात आली होती.आंदेकर टोळीने वनराज आंदेकर यांच्या खुनाचा बदला घेण्याचा कट रचल्याचे नुकत्याच

### आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल

धनकवडीतील आंबेगाव पठार परिसरात सोमनाथ गायकवाड आणि अनिरुद्ध दूधभाते रहायला आहेत. आंदेकर टोळीने गायकवाड आणि दूधभाते यांच्या निकटवर्तीयांवर पाळत ठेवली होती. भारती विद्यापीठ पोलीस आणि गुन्हे शाखेने कारवाई करून एकाला अटक केली होती. याप्रकरणी कृष्णा आंदेकर यांच्यासह आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता.

उघडकीस आले. धनकवडीतील आंबेगाव पठार परिसरात सोमनाथ गायकवाड आणि अनिरुद्ध दूधभाते रहायला आहेत. आंदेकर टोळीने गायकवाड आणि दूधभाते यांच्या निकटवर्तीयांवर पाळत ठेवली होती. भारती विद्यापीठ पोलीस आणि गुन्हे शाखेने कारवाई करून एकाला अटक केली होती. याप्रकरणी कृष्णा आंदेकर यांच्यासह आरोपींविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात सोमनाथ गायकवाड, अनिरुद्ध दूधभाते, वनराज आंदकर यांची बहीण संजीवनी कोमकर, जयंत कोमकर आणि गणेश कोमकर यांच्यासह १६ आरोपींना अटक करण्यात आली.

दहाव्या दिवशी बाप्पाला निरोप — भव्य मिरवणुकांनी डोळ्याचे पारणे फेडले

# गणेश विसर्जनासाठी महापालिका सज्ज!

## विसर्जन स्थळांवर वैद्यकीय पथके, रुग्णवाहिका, जीवरक्षक, निर्माल्य संकलनाची व्यवस्था

पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिका दरवर्षीप्रमाणे यंदाही पिंपरी चिंचवड शहरातील गणेश विसर्जन सुरळीत, सुरक्षित व पर्यावरणपूरक पद्धतीने पार पडावे, यासाठी सज्ज झाली आहे.**




> गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांची सुरक्षितता हीच आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. विसर्जन घाटांवर जीवरक्षक, वैद्यकीय पथके व आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा तैनात असून, पर्यावरणपूरक व सुरळीत विसर्जनासाठी महापालिका सज्ज आहे. नागरिकांनी देखील विसर्जन घाटांवर तैनात असणारे रेस्क्यू पथक व सुरक्षा पथकांकडून देण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करून प्रशासनाला सहकार्य करावे.
> **-शेखर सिंह,** आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी चिंचवड महापालिका

विसर्जन काळात नागरिकांच्या सुरक्षेसोबतच आरोग्य सुविधा, स्वच्छता व पर्यावरण संवर्धन यासाठी महापालिकेच्या विविध विभागांकडून व्यापक नियोजन करण्यात आले आहे. आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर यांच्या मार्गदर्शनाखाली पर्यावरण, आरोग्य, वैद्यकीय, अग्निशमन दल, आपत्ती व्यवस्थापन, स्थापत्य, सुरक्षा असे महापालिकेचे विविध विभाग समन्वयाने काम करत आहेत.

शहरातील २७ अधिकृत विसर्जन घाटांवर प्रकाशयोजना, पिण्याचे पाणी, पार्किंग, वैद्यकीय सुविधा, सुरक्षाव्यवस्था आणि वाहतूक नियोजनाची सोय करण्यात आली आहे. मोशी खाण हे मुख्य विसर्जन स्थळ निश्चित करण्यात आले असून, येथे क्रेन, आवश्यक मनुष्यबळ, पथदिवे, रस्त्यांची सुधारणा, दिशादर्शक फलक, सुरक्षारक्षक बंदोबस्त आणि अग्निशमन यंत्रणा तैनात केली आहे. प्रत्येक घाटावर प्रशिक्षित जीव रक्षक पथके, रेस्क्यू बोट, लाईफ जॅकेट्स, लाईफ रिंग्स आदी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. गर्दी व आपत्कालीन परिस्थिती हाताळण्यासाठी आपत्ती व्यवस्थापन दल देखील सज्ज ठेवले आहे. नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिने महत्त्वाच्या विसर्जन घाटांवर वैद्यकीय पथके व सुसज्ज रुग्णवाहिका उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. वैद्यकीय अधिकारी, नर्स, वॉर्डबॉय आणि सफाई कर्मचाऱ्यांची नेमणूक करण्यात आली असून, मुबलक औषधसाठा व तात्काळ उपचारासाठी आवश्यक उपकरणे सज्ज ठेवण्यात आली आहेत.

**पर्यावरणपूरक उपक्रमांवर भर**

यंदा पर्यावरणपूरक उपक्रमांवर विशेष भर देण्यात आला आहे. शहरभरात कृत्रिम जलकुंडे व निर्माल्य संकलन कुंडे उभारण्यात आले आहेत. नागरिकांनी हार, फुले, पाने व पूजेचे साहित्य थेट नदी-नाल्यात न टाकता निर्माल्य कुंड्यांमध्ये टाकावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे. संकलित निर्माल्यापासून कंपोस्ट खत व सुगंधी उत्पादने तयार करण्याची योजना महापालिकेकडून हाती घेण्यात आली आहे. तसेच 'पुनरावर्तन' उपक्रमांतर्गत २६ केंद्रांवर शाडू मातीच्या मूर्ती संकलित करून मूर्तिकारांना शाडू माती पुनर्वापर करण्यासाठी उपलब्ध करून दिली जाणार आहे. याशिवाय पीओपी मूर्तींसाठी अमोनियम बायकार्बोनेटचा वापर करून प्रदूषण नियंत्रणाची सोय करण्यात आली आहे. तरी नागरिकांनी विसर्जनासाठी अधिकृत घाटांचा वापर करावा, नदीत थेट प्रवेश करू नये, लहान मुलांना पाण्याजवळ एकटे सोडू नये तसेच निर्माल्य थेट पाण्यात न टाकता कुंड्यांमध्ये जमा करावे, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

# गणेश विसर्जनासाठी पिंपरी चिंचवडमध्ये तगडा पोलीस बंदोबस्त

## सह आयुक्त, अपर आयुक्त, उपायुक्त, सहायक आयुक्त यांच्यासहित 3 हजार पोलिसांचा शहरात बंदोबस्त

।पिंपरी-चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**गणेश विसर्जन मिरवणूक शांततेत पार पडाव्यात, कायदा - सुव्यवस्था कायम राहावी, यासाठी पिंपरी-चिंचवड पोलिसांनी चोख नियोजन केले आहे. सुमारे तीन हजार पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात राहणार आहे. त्यामध्ये १७ शीघ्र कृती पथके, सहा दंगल नियंत्रक तर दोन राज्य राखीव पोलिस दलाच्या पथकांचा समावेश असणार आहे.**



पोलिस आयुक्तालय हद्दीत एकूण दोन हजार १४६ सार्वजनिक गणपतींची स्थापना झाली आहे. त्यापैकी सांगवी, तळेगाव दाभाडे, भोसरी यासह काही भागांतील सार्वजनिक गणेश मंडळांच्या मूर्तीचे विसर्जन झाले आहे.

भोसरीतील परिसरातील सार्वजनिक गणेश मंडळांचे शुक्रवारी पार पडले. इतर भागांतील मंडळांच्या गणेश मूर्तीचे विसर्जन शनिवारी होत आहे. विसर्जन मिरवणुका शांततेत पार पडाव्यात यासाठी पोलिसांनी नियोजन केले आहे. हद्दीतील सर्व विसर्जन मार्ग व विसर्जन घाट, स्थळे यांना पोलिस अधिकाऱ्यांनी महापालिका, महावितरण व इतर संबंधित शासकीय अधिकारी यांच्यासह संयुक्त भेटी देऊन पाहणी केली आहे. पोलिसांकडून ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठीही नियोजन केले आहे. ध्वनीची तीव्रता मोजण्यासाठी सर्व पोलिस ठाण्यांना ध्वनी पातळी मापक यंत्र (नॉइज लेवल मीटर) पुरविले आहेत. उत्सव कालावधीत त्याद्वारे मोजमाप करुन संबंधितांवर योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलिसांनी सांगितले.

यावर्षी गणपती बाप्पांना निरोप देताना डीजे चा दणदणाट आणि धिंगाणा खपवून घेतला जाणार नाही. असा इशारा पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांनी दिला आहे. बाप्पांची मिरवणूक म्हटलं की डीजेचा कर्कश्य आवाजाने नकोसा वाटतो. डिजेवर पोलिसांची करडी नजर असणार आहे.

पोलीस आयुक्तालयात सुमारे तीन हजार पोलिसांचा बंदोबस्त असणार आहे. यामध्ये एक सह पोलीस आयुक्त, एक अप्पर पोलीस आयुक्त, सहा पोलीस उपायुक्त, सहा सहाय्यक पोलीस आयुक्त, ६४ पोलीस निरीक्षक, २ हजार ३५० पेक्षा अधिक अंमलदार, २९१ सहाय्यक निरीक्षक, उपनिरीक्षक, ४०० होमगार्ड, एक बॉम्ब शोधक आणि नाशक पथक, १७ शीघ्र कृती पथक, सहा दंगल नियंत्रण पथके आणि दोन राज्य राखीव पोलीस दल यांचा तगडा बंदोबस्त असणार आहे.

### असा असेल बंदोबस्त

| | |
|---|---|
| सह आयुक्त | - १ |
| अपर आयुक्त | - १ |
| उपायुक्त | - ६ |
| सहायक आयुक्त | - ६ |
| पोलिस निरीक्षक | - ६४ |
| सहायक निरीक्षक, उपनिरीक्षक | - २९१ |
| अंमलदार | - २ हजार |
| ३५५ | |
| होमगार्ड | - ४०० |
| बॉम्ब शोधक व नाशक पथक - एक | |
| शीघ्र कृती पथके | - १७ |
| दंगल नियंत्रक पथके | - ६ |
| राज्य राखीव पोलिस दल | - २ |


# भारतातील सेमीकंडक्टर क्रांती



भूमिका

**सुरुवातीच्या काळात संगणक ही संपूर्ण खोली व्यापणारी महाकाय यंत्रे होती. ती त्यांच्या काळातील स्विचप्रमाणे काम करणाऱ्या हजारो व्हॅक्यूम ट्यूबवर चालत आणि जुन्या टेलिफोन एक्सचेंजसारखी दिसत. त्यापेक्षा कितीतरी जास्त कार्यशक्ती आजच्या काळात नखापेक्षाही लहान चिपमध्ये असते.**

अब्जावधी ट्रान्झिस्टरद्वारे चालणाऱ्या या चिप्स मोबाइल फोन, मोटारी, रेल्वेगाड्या, रेफ्रिजरेटर, टीव्ही, स्कूटी, फॅक्टरी मशीन, विमाने तसेच अंतराळात उपग्रहांना मार्गदर्शन करतात. त्या इतक्या लहान आहेत की त्या आता तुमच्या बोटावर एका स्मार्ट रिंगमध्ये बसतात आणि तुमच्या हृदयाच्या आरोग्याचा मागोवा घेतात. सेमीकंडक्टरची ही जादू आहे!राष्ट्राच्या प्रगतीसाठी, विकासाला आकार देणाऱ्या प्रमुख क्षेत्रांवर प्रभुत्व मिळवावे लागते. या मूलभूत क्षेत्रांमध्ये पोलाद, वीज, दूरसंचार, रसायने, वाहतूक यांच्याप्रमाणेच सेमीकंडक्टर क्षेत्राचा समावेश आहे. सेमीकंडक्टर उद्योग हा पायाभूत उद्योग आहे. ज्याप्रमाणे पोलाद कारखाने पूल आणि रेल्वे उभारणीचा आधार आहेत, तसे सेमीकंडक्टर डिजिटल अर्थव्यवस्थेचा आधार आहेत. या चिप्सशिवाय आधुनिक संप्रेषण, डेटा प्रोसेसिंग, एआय, अक्षय ऊर्जा प्रणाली आणि सुरक्षित



संरक्षण असूच शकत नाही. जो देश सेमीकंडक्टरचे आरेखन व उत्पादन करू शकत नाही त्याला आरोग्यसेवेपासून सुरक्षेपर्यंतच्या सर्व मूलभूत गरजांसाठी इतरांवर अवलंबून राहण्याचा धोका पत्करावा लागतो.कोविड-१९ महासाथीने सेमीकंडक्टर चिप्सचे महत्त्व स्पष्टपणे लक्षात आणून दिले. जागतिक चिपपुरवठा साखळी ढासळल्याने विविध उद्योगांच्या उत्पादनावर परिणाम झाला. वाहन उद्योग, नेटवर्किंग उपकरणे, ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स इत्यादी क्षेत्रांना याचा सर्वाधिक फटका बसला. सेमीकंडक्टर आता जागतिक भूराजनीतीच्या केंद्रस्थानी आहेत. सेमीकंडक्टर चिपनिर्मिती काही प्रदेशांमध्ये केंद्रित असल्याने किरकोळ व्यत्ययामुळेही जगभरात हादरे जाणवू शकतात.

एका ठिकाणी वीजपुरवठा खंडित झाल्यास किंवा दुसऱ्या ठिकाणी कारखान्यातील अपघातामुळे पुरवठा बंद होऊ शकतो. यामुळे उद्योग मंदावू शकतात; अर्थव्यवस्था व सुरक्षिततेवर सर्वत्र परिणाम होऊ शकतो.दुर्मीळ पृथ्वी चुंबकांवर अलीकडेच देण्यात आलेला भर हा महत्त्वाच्या संसाधनांवरील नियंत्रण जागतिक शक्तीला कसे आकार देऊ शकते, याची स्पष्ट जाणीव देणारा आहे. त्याचप्रमाणे, सेमीकंडक्टर हे डिजिटल युगाचे एक महत्त्वाचे संसाधन बनले आहे.भविष्यात सेमीकंडक्टर्सची मागणी वाढणार आहे. आपला स्वत:चा इलेक्ट्रॉनिक्सचा वापर आणि उत्पादन अभूतपूर्व वेगाने वाढत आहे. आज भारतात ६५ कोटींहून अधिक स्मार्टफोन वापरकर्ते आहेत आणि आपले इलेक्ट्रॉनिक्स उत्पादन प्रतिवर्षी १२ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचत आहे. त्याच वेळी, भारत एआय-आधारित प्रणाली, डेटा सेंटर आणि सेमीकंडक्टर चिप्सची आवश्यकता असलेली इलेक्ट्रिक वाहनेदेखील विकसित करत आहे. मागणी आणि नवोन्मेष या दोन्हींमध्ये वाढ झाल्यामुळे भारताला जागतिक सेमीकंडक्टर मूल्य साखळीत आपले स्थान सुरक्षित करण्याची आवश्यकता निर्माण झाली आहे.अनेक दशकांपासून भारताने सेमीकंडक्टर क्षेत्रातील 'बस चुकवली' म्हणजेच संधी गमावली, असे सांगितले जात होते. ती तक्रार आता खरी राहिलेली नाही. 'इंडिया सेमीकंडक्टर मिशन'अंतर्गत १० सेमीकंडक्टर कारखान्यांना मंजुरी देण्यात आली असून या कारखान्यांचे बांधकाम वेगाने सुरू आहे. आज आपण आत्मविश्वासाने म्हणू शकतो की यावर्षी पहिली 'मेड इन इंडिया' चिप बाहेर येईल. साणंदमध्ये एका युनिटमध्ये पथदर्शी उत्पादनरेषा सुरू झाली आहे व एका वर्षात आणखी चार युनिट्समध्ये उत्पादन सुरू होण्याची अपेक्षा आहे.अप्लाइड मटेरियल्स, लॅम रिसर्च, मर्क आणि लिंडे यासारखे जागतिक नेतृत्व हे कारखाने आणि पुरवठा साखळ्यांना पाठिंबा देण्यासाठी गुंतवणूक करत आहेत. सेमीकंडक्टरच्या दीर्घकालीन वाढीवर पंतप्रधानांचे लक्ष असण्यातून, परिसंस्थाकेंद्रित दृष्टिकोन दिसून येतो.

## प्रासंगिक »

### चार राहिलेच

***करातील हास्यास्पद विसंवाद नव्या 'सुधारणां'मुळे काही प्रमाणात कमी होतील; पण कराचे टप्पे दोनच केल्याचा सरकारचा दावा फसवा...***

स्वातंत्र्यदिनी लाल किल्ल्यावरून पंतप्रधानांनी जाहीर केलेली दिवाळी भेट अवघ्या तीन आठवड्यांत आकारास आली आणि घटस्थापना दिनापासून नागरिकांस ती मिळू लागेल. वस्तू व सेवा करात- म्हणजे 'जीएसटी'त – कपात ही ती भेट. त्यांनी अखेर ती दिली हे चांगले झाले. तथापि यास भेट म्हणावे काय, हा प्रश्न. कारण भेट ही स्वखुशीने दिली जाते. परिस्थितीच्या रेट्यामुळे द्यावी लागते तीस भेट म्हणणे अंमळ अवघड. म्हणजे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी त्यांच्या वेडाचारामुळे आपला निर्यातीसाठी गळा घोटला नसता, त्यातून अर्थव्यवस्था जायबंदी होण्याची परिस्थिती निर्माण झाली नसती आणि बिहार निवडणुका तोंडावर नसत्या तर केंद्र सरकारकडून ही कथित भेट दिली गेली असती का, हा प्रश्न. आपटले तरी नागरिकांकडून मागणीची सुई हलता हलत नाही हे वास्तव. वस्तू-सेवा कर कपातीमागे हे कारण आहे.

सार्वजनिक वाहतूक व्यवस्था म्हणजे पुण्याची पीएमपी, मुंबईची बेस्ट, लोकल रेल्वे, एसटी आणि आता मेट्रो. या तोट्यात असणाऱ्या व्यवस्था बंद कराव्यात व त्यांचे खासगीकरण करून टाकावे असा फक्त नफा-तोट्याचा विचार करणाऱ्या मंडळींचे म्हणणे आहे. सरकारने या उद्योगात पडूच नये.

# सार्वजनिक वाहतूक व्यवस्था कशी सुधारणार?

'मिनिमम गव्हर्नमेंट' धोरणाची भलामण करणारे अनेक तज्ज्ञ आणि सरकारी उच्चपदस्थ आहेत. परंतु या नफ्या तोट्याच्याही पलीकडे पर्यावरण रक्षणाचा विचार आहे. 'झाडे लावा'पलीकडे ज्यांना पर्यावरण रक्षण म्हणजे काय हे माहीत नसते, त्यांना हा मुद्दा समजावण्याचा प्रयत्न.सध्याची सार्वजनिक वाहतूक व्यवस्था ही गरिबांना परवडणारी, सर्वदूर पोहोचणारी, त्यांना सोयीची आहे. परंतु सध्या ती खिळखिळी झालेली आहे. पुणे – पिंपरी चिंचवडसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात तीन हजार बसेस रस्त्यावर असायला हव्यात. मात्र गेली कित्येक वर्षे १५०० हून अधिक बसेस कधीच रस्त्यावर नव्हत्या. तीच गोष्ट मुंबईच्या बेस्टची आहे. एसटीचा विचार केला तर आणखी बसेसची गरज आहे. परंतु त्या दिवसेंदिवस कमी होत चालल्या आहेत. त्यासाठी पुनुकतेच सरकारने दापोडी तसेच इतर दोन ठिकाणचे बसेसच्या बॉडी बिल्डिंगचे तीन वर्कशॉप्स बंद करण्याचा निर्णय घेतलेला आहे. त्या ठिकाणी एकंदर



२५०० कर्मचारी काम करत होते. पुणे ते लोणावळा लोकल रेल्वे रोज सुमारे दोन लाख प्रवाशांची वाहतूक करते. या वाहतुकीत वाढ करण्याची गरज आहे. त्यासाठी दोनचे चार ट्रॅक करावेत अशी २०-२५ वर्षांपासून मागणी आहे. सरकारही त्याला अनुकूल आहे. पण प्रत्यक्षात फारसे काहीच झालेले नाही. या काळात सरकारचा सर्व भर पुणे परिसरात मेट्रो वाढविण्यावर आहे. मेट्रो उभारणीचा आणि चालविण्याचा खर्च प्रचंड आहे.

जगात कुठेही फायदेशीर नसलेली तोट्यातली मेट्रो तज्ज्ञ, राजकारणी आणि उच्चपदस्थांच्या पसंतीची आहे. ढील तक्ता पाहा.पिंपरी ते पुणे मेट्रो उभारणीचा खर्च सुमारे २५ हजार कोटी रु. झाला. त्यातले प्रत्येकी ३०० कोटी म्हणजे एकंदर ६०० कोटी रु. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने दिले. शिवाय मागच्या वर्षी सरकारने घरांच्या खरेदी-विक्रीतून एक टक्का मुद्रांक शुल्क म्हणून एकंदर ४०० कोटी रु. जमा केले. याउलट पुणे ते लोणावळा दरम्यान रेल्वेचे दोनऐवजी चार ट्रॅक करण्यासाठी फक्त आठ हजार कोटी खर्च होता.

परंतु मेट्रोला प्राधान्य देण्यासाठी सरकारने हा खर्च टाळला. मेट्रोसाठी ६०० कोटी रु. देणाऱ्या पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने रेल्वे ट्रॅकसाठी पैसे द्यायला चक्क नकार दिला.खासगी गाड्यांच्या संख्येत वाढ: सार्वजनिक वाहतूक बिनभरवशाची असल्यामुळे लोक कसेही करून, कर्ज काढून स्वत:च्या गाड्या घेतात. सध्या पुणे शहरात ४० लाख ४२ हजार खासगी वाहने आहेत, अशी माहिती राज्याच्या मंत्री माधुरी मिसाळ यांनी नुकतीच विधानसभेत दिली. (लोकसत्ता, ४ जुलै २०२५) पुणे जिल्ह्यात रोज ८०० नवीन वाहनांची भर पडते.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

महायुतीवर साधला निशाणा

## भाजपकडून अपेक्षा चुकीची – विजय वडेट्टीवार

# संघालाच आरक्षण मान्य नाही मग!

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भाजपचा मार्गदर्शक राष्ट्रीय स्वयंसेवक संघालाच आरक्षण मान्य नाही, मग त्यांच्याकडून त्यासाठी अपेक्षा ठेवणे चुकीचे आहे. हे सरकार एकाच्या पाठीत खंजीर खुपसून दुसऱ्याला खोटे आश्वासन देत वाऱ्यावर सोडून केवळ बनवाबनवी करत आहे. दोन समाजांना आमने- सामने आणत संघर्ष पेटवून समाजात विष पेरत असल्याचे टीकास्त्र विधानसभेतील विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी सोडले.**

## माध्यमांवर नाराजी;महायुतीत संघर्ष



कराडमध्ये पत्रकार परिषदेत ते बोलत होते. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रणजितसिंह देशमुख, ओबीसी शाखेचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. पैगंबर जयंतीनिमित्त मुस्लीम समाजातर्फे वडेट्टीवार यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. विजय वडेट्टीवार म्हणाले, भाजप व महायुती सरकारकडून आरक्षण संपवण्याचा घाट घातला जात असून, त्याचा सर्वाधिक फटका इतर मागास समाजाला बसणार आहे. सरकारने काढलेला आदेश (जीआर) हा मराठा समाजाची फसवणूक करणारा आहे. कुणबी दाखल्याला आमचा विरोध नाही. मात्र, इतर मागास समाजानेच आता खुल्या प्रवर्गात येणे हेच त्यांच्या फायद्याचे ठरेल, त्यासाठी त्यांना आपण तसे आवाहन करणार असल्याचे उपहासात्मक विधान वडेट्टीवार यांनी केले. राज्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी, अतिवृष्टीची मदत, अपेक्षित आधार दिला जात नाही. लाडक्या बहिणींना दोन महिन्यांपासून पैसे मिळालेले नाहीत. ठेकेदारांची देयकेही थकल्याने त्यांच्याही आत्महत्या सुरू आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा खोट्या आश्वासनांचा पाऊस पाडला जाईल, अशी टीका करताना मात्र जनतेने त्याला भुलू नये, असे आवाहन वडेट्टीवार यांनी केले.बेरोजगारी, महागाई व भ्रष्टाचाराविरोधात काँग्रेस रस्त्यावर आहे. पण, माध्यमांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची नाराजी त्यांनी एका प्रश्नावर बोलताना उघड केली. नागपूर, भंडारा, अमरावतीत मोठे मोर्चे निघाले. पण, उद्योगपतींच्या हातात गेलेल्या माध्यमांकडून त्यांना प्रसिद्धी मिळत नाही. राहुल गांधींनी मतचोरीचा प्रश्न उपस्थित केला, त्याला पंतप्रधान उत्तर देत नसल्याची खंत वडेट्टीवार यांनी व्यक्त केली.

'महायुती' हे मतांची चोरी करून सत्तेत आलेले सरकार. त्यांचे महिलांवरील अत्याचार, बेरोजगारी आणि जनतेच्या मूलभूत प्रश्नांकडे कसलेही लक्ष नसल्याची टीका वडेट्टीवार यांनी केली. राज्यात शिंदे- फडणवीस यांच्यातील संघर्ष उघड होत असून, शिंदे गटातील मंत्र्यांमध्ये अस्वस्थता आहे. 'महायुती'तील तिघे सत्तेतील वाट्यासाठी सतत भांडत असल्याचीही टीका वडेट्टीवार यांनी केली. कराडमध्ये पत्रकार परिषदेत ते बोलत होते. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष रणजितसिंह देशमुख, ओबीसी शाखेचे प्रदेशाध्यक्ष भानुदास माळी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. पैगंबर जयंतीनिमित्त मुस्लीम समाजातर्फे वडेट्टीवार यांचा याप्रसंगी सत्कार करण्यात आला. विजय वडेट्टीवार म्हणाले, भाजप व महायुती सरकारकडून आरक्षण संपवण्याचा घाट घातला जात असून, त्याचा सर्वाधिक फटका इतर मागास समाजाला बसणार आहे. सरकारने काढलेला आदेश (जीआर) हा मराठा समाजाची फसवणूक करणारा आहे. कुणबी दाखल्याला आमचा विरोध नाही. मात्र, इतर मागास समाजानेच आता खुल्या प्रवर्गात येणे हेच त्यांच्या फायद्याचे ठरेल, त्यासाठी त्यांना आपण तसे आवाहन करणार असल्याचे उपहासात्मक विधान वडेट्टीवार यांनी केले. राज्यात शेतकऱ्यांना कर्जमाफी, अतिवृष्टीची मदत, अपेक्षित आधार दिला जात नाही. लाडक्या बहिणींना दोन महिन्यांपासून पैसे मिळालेले नाहीत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर पुन्हा खोट्या आश्वासनांचा पाऊस पाडला जाईल, अशी टीका करताना मात्र जनतेने त्याला भुलू नये, असे आवाहन वडेट्टीवार यांनी केले.

## मतांची चोरी करून सत्तेत आले

बेरोजगारी, महागाई व भ्रष्टाचाराविरोधात काँग्रेस रस्त्यावर आहे. पण, माध्यमांकडून अपेक्षित प्रतिसाद मिळत नसल्याची नाराजी त्यांनी एका प्रश्नावर बोलताना उघड केली. नागपूर, भंडारा, अमरावतीत मोठे मोर्चे निघाले. पण, उद्योगपतींच्या हातात गेलेल्या माध्यमांकडून त्यांना प्रसिद्धी मिळत नाही. राहुल गांधींनी मतचोरीचा प्रश्न उपस्थित केला, त्याला पंतप्रधान उत्तर देत नसल्याची खंत वडेट्टीवार यांनी व्यक्त केली.'महायुती' हे मतांची चोरी करून सत्तेत आलेले सरकार.

# पवार कुटुंबीयांची रसद हे वक्तव्य चुकीचे

## ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कुठेही धक्का लागणार नाही

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्या उपोषणावर राज्य सरकारने काढलेला आदेश आरक्षणाच्या संदर्भाने काढलेला मार्गदर्शक आराखडा (रोड मॅप) आहे. आदेशामध्ये ओबीसीमध्ये समाविष्ट केल्याचे कुठेही नमूद नाही. परंतु या आदेशाने ओबीसी समाजाच्या आरक्षणाला कुठेही धक्का लागणार नाही.**



असे सांगत राज्यातील माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते (शरद पवार गट) हर्षवर्धन पाटील यांनी मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाला पवार कुटुंबीयांनी रसद पुरवण्यात आल्याच्या संदर्भाने करण्यात येणारी वक्तव्ये चुकीचे असल्याचे मत व्यक्त केले. ते परळी येथे माध्यमांसमोर शुक्रवारी बोलत होते.ओबीसी नेते लक्ष्मण हाके यांच्या बारामतीत शुक्रवारी काढलेल्या मोर्चावर पाटील म्हणाले, की लोकशाहीत कोणालाही मोर्चा काढण्याचा अधिकार आहे.

जरांगे यांना शरद पवार कुटुंबीयांनी रसद पुरवल्याचा प्रा. हाके आरोप करत आहेत, त्यांनी तसे पुरावे द्यावेत. अजित पवार यांनी महिला पोलीस अधिकाऱ्याला धमकावल्याचे समोर आल्याकडे पाटील यांचे लक्ष वेधल्यानंतर ते म्हणाले, की याबाबतची सत्य परिस्थिती तपासून घेतली पाहिजे. अधिकाऱ्याचे ऐकून घेतले पाहिजे. राज्यकर्त्यांनी अशा प्रसंगाच्या वेळेला संयमाने घेतले पाहिजे. असे सांगत राज्यातील माजी मंत्री, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते हर्षवर्धन पाटील यांनी मनोज जरांगे यांच्या मराठा आरक्षण आंदोलनाला पवार कुटुंबीयांनी रसद पुरवण्यात आल्याच्या संदर्भाने करण्यात येणारी वक्तव्ये चुकीचे असल्याचे मत व्यक्त केले.

## मोर्चा काढण्याचा अधिकार

बारामतीत शुक्रवारी काढलेल्या मोर्चावर पाटील म्हणाले, की लोकशाहीत कोणालाही मोर्चा काढण्याचा अधिकार आहे. जरांगे यांना शरद पवार कुटुंबीयांनी रसद पुरवल्याचा प्रा. हाके आरोप करत आहेत, त्यांनी तसे पुरावे द्यावेत. अजित पवार यांनी महिला पोलीस अधिकाऱ्याला धमकावल्याचे समोर आल्याकडे पाटील यांचे लक्ष वेधल्यानंतर ते म्हणाले.

**अमेरीकेकची भारतावर टिका** भारताच्या कर धोरणावर अमेरिका सातत्याने टीका करीत आहे

# चीनसमोर भारत-रशियाला गमावले

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अंधारमय अशा चीनसमोर अमेरिकेने भारत आणि रशियाला गमावले असल्यासारखे वाटत आहे. या सर्वांना दीर्घ आणि समृद्धीचे भविष्य लाभो,' अशी उपरोधिक टिप्पणी अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी 'ट्रूथ सोशल'वर केली. समाज माध्यमावर संदेश प्रसृत टाकून त्यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या. दरम्यान, भारत-अमेरिकेतील संबंध आणखी रसातळाला गेल्याचे चित्र यामुळे निर्माण झाले आहे.**

पंतप्रधान नरेंद्र मोदी, चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांची शांघाय सहकार्य संघटनेच्या पार्श्वभूमीवर भेट झाली. तिघांमधील जवळीक अमेरिकेला खटकणारी ठरली आहे. रशियातून भारत तेलखरेदी करीत असल्याच्या कारणावरून आयातशुल्कात वाढ आणि भारताच्या कर धोरणावर अमेरिका सातत्याने टीका करीत आहे. अमेरिकेचे अध्यक्ष ट्रम्प, त्यांचे व्यापार सल्लागार पीटर नव्हारो भारतावर बोचरी टीका करीत आहेत.

## नडेला यांच्या कामाचे कौतुक



'मायक्रोसॉफ्ट'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सत्या नाडेला, 'गूगल'चे प्रमुख सुंदर पिचाई यांच्या कामाची अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी कौतुक केले आहे. अमेरिकी-भारतीय असलेल्या या दोघांनी ट्रम्प यांच्या तंत्रज्ञान आणि 'एआय' धोरणाची स्तुती केली. व्हाइट हाउसमध्ये या दोघांना भोजनाचे आमंत्रण होते. ट्रम्प म्हणाले, 'मोठा 'आयक्यू' असणारा हा गट उद्योग क्षेत्रातील क्रांतीचे नेतृत्व करीत आहे. या चर्चेसाठी बुद्धिमान लोक एकत्र आले आहेत. मला त्यांचा अभिमान आहे.' 'मायक्रोसॉफ्ट'चे सहसंस्थापक बिल गेट्स आणि 'मेटा'चे 'सीईओ' मार्क झुकरबर्ग हेदेखील या वेळी उपस्थित होते. पिचाई यांच्यासह 'ॲपल'चे सीईओ टिम कूक हेदेखील या ठिकाणी होते.नाडेला आणि पिचाई यांना ट्रम्प यांनी अमेरिकेमध्ये किती गुंतवणूक करीत आहात, असा प्रश्न विचारला. त्यावर पिचाई यांनी येत्या दोन वर्षांत २५० अब्ज डॉलर गुंतवणूक अमेरिकेत कंपनी करील, असे सांगितले, तर नाडेला यांनी कंपनी दर वर्षी ७५ ते ८० अब्ज डॉलर अमेरिकेत गुंतवणूक करते, असे सांगितले. त्यावर ट्रम्प यांनी स्तुतिपर उद्गार काढले. अमेरिकेचे वाणिज्य सचिव हॉवर्ड लुटनिक यांनी शुक्रवारी म्हटले की, त्यांना अपेक्षा आहे की भारत पुढील एक किंवा दोन महिन्यांत पुन्हा व्यापार वाटाघाटीसाठीच्या येईल आणि व्यापार करारावर स्वाक्षरी "माफी मागेल", कारण

## ...तर मग ५० टक्के टॅरिफ भरा

लोकांनी हे लक्षात ठेवावे की, आपली ३० ट्रिलियन डॉलर्सची अर्थव्यवस्था जगाची ग्राहक आहे. म्हणून शेवटी त्या सर्वांना ग्राहकांकडे परत यावे लागेल, कारण आपल्याला सर्वांना माहित आहे की, शेवटी ग्राहक नेहमीच बरोबर असतो", असे लुटनिक म्हणाले.लुटनिक शेवटी म्हणाले की, "तुम्ही कॅनडाबरोबर काय झाले हे पाहिले. त्यांनी प्रत्युत्तरात्मक टॅरिफ लादले. ते धाडसी होते. आणि काय झाले?

अमेरिका हा जगातील सर्वात मोठा ग्राहक आहे आणि "ग्राहक नेहमीच बरोबर असतो". "मला वाटते, हो, एक-दोन महिन्यांतच भारत चर्चेच्या टेबलावर असेल. ते माफी मागतील आणि डोनाल्ड ट्रम्प यांच्याशी करार करण्याचा प्रयत्न करतील. पंतप्रधान नरेंद्र मोदींशी कसे वागायचे हे डोनाल्ड ट्रम्प यांच्या हातात असेल", असे लुटनिक यांनी ब्लूमबर्ग टीव्हीला दिलेल्या मुलाखतीत म्हटले. लुटनिक म्हणाले की, "भारताला त्यांची बाजारपेठ अमेरिकेसाठी खुली करायची नाही, रशियाकडून खरेदी थांबवायची नाही आणि ब्रिक्स गटातूनही बाहेर पडायचे नाही. भारत रशिया आणि चीनमधील एक स्वर आहे. जर त्यांना तेच व्हायचे असेल तर व्हा. पण एकतर डॉलरला पाठिंबा द्या, अमेरिकेला पाठिंबा द्या, तुमचा सर्वात मोठा क्लायंट, जो अमेरिकन ग्राहक आहे, त्याला पाठिंबा द्या, किंवा मला वाटते की, मग तुम्ही ५० टक्के टॅरिफ भरा."लुटनिक म्हणाले की "अमेरिका चर्चेस तयार आहे", परंतु अमेरिका हा जगातील सर्वात मोठी ग्राहक बाजारपेठ आहे असेही त्यांनी ठामपणे सांगितले. भारताला कोणत्या बाजूला राहायचे आहे हे, त्यांनी ठरवावे लागेल. मजेदार गोष्ट म्हणजे, आपण चीन आणि भारत या दोन्ही देशांची ग्राहक बाजारपेठ आहोत. त्यामुळे ते दोन्ही देश एकमेकांच्या देशात विक्री करू शकणार नाहीत. आपण जगाचे ग्राहक आहोत.

# मोदींचा चीन दौरा पार पडताच पाकिस्तानला झटका

## कॉरिडॉरसाठी कोणताही निधी किंवा मोठे प्रकल्प मिळवता आले नाही

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारत, चीन आणि रशियाविरोधी घेतलेल्या भूमिकांमुळे हे तिन्ही देश एकमेकांच्या जवळ येत असल्याचे पाहायला मिळत आहे. चीनमध्ये या आठवड्याच्या सुरुवातीला झालेल्या शांघाय सहकार्य परिषदेसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीही उपस्थित होते. हा पंतप्रधान मोदींचा सात वर्षांतील पहिला चीन दौरा होता.**



या परिषदेदरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी, रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतीन आणि चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांचे काही फोटो व्हायरल झाले होते. यातून या तिन्ही नेत्यांनी डोनाल्ड ट्रम्प यांना अप्रत्यक्षपणे इशाराच दिला होता.दरम्यान, पंतप्रधान मोदींचा चीन दौरा पार पडल्यानंतर चीनने पाकिस्तानला मोठा धक्का दिला आहे. चीनने पाकिस्तानच्या सर्वात महत्त्वाकांक्षी चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर प्रकल्पातून (मेन लाइन-१) माघार घेतली आहे. चीनच्या या पावल्यानंतर भारताशी चांगले संबंध राखण्यासाठी हा निर्णय घेतल्याची चर्चा सुरू झाली आहे.एकीकडे पाकिस्तानचे अमेरिकेशी असलेले संबंध वाढले आहेत आणि तियानजिनमधील शांघाय सहकार्य परिषदेनंतर भारताची चीन आणि रशियाशी वाढती जवळीक यामुळे चीनच्या अलिप्ततेला एक भू-राजकीय पार्श्वभूमी मिळाली आहे.दरम्यान, शांघाय सहकार्य परिषदेला पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफही उपस्थित होते. यावेळी त्यांना चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉरसाठी कोणताही नवा निधी किंवा मोठे प्रकल्प मिळवता आले नाहीत.

## आर्थिक कॉरिडॉर पायाभूत प्रकल्प

ज्यामध्ये प्रामुख्याने शेती, इलेक्ट्रिक वाहने, सौर ऊर्जा, आरोग्य आणि स्टील या क्षेत्रांचा समावेश आहे. परंतु चीनने यामध्ये कोणतीही गुंतवणूक केलेली नाही.चीन-पाकिस्तान आर्थिक कॉरिडॉर हा एक पायाभूत सुविधा प्रकल्प आहे ज्याचा उद्देश चीनच्या वायव्य शिनजियांग प्रदेशाला पाकिस्तानच्या अरबी समुद्रातील ग्वादर बंदराशी रस्ते, रेल्वे, पाइपलाइन आणि ऊर्जा प्रकल्पांच्या जाळ्याद्वारे जोडणे आहे.

# गणपतीबाप्पा मोरया पुढच्या वर्षा लवकर या..!

भाद्रपद शुध्द चतुर्दशीला अनंत चतुर्दशी म्हणत असतात. या दिवशी अनंत म्हणजे विष्णुची पूजा करतात व अनंताचे व्रत करतात. आपल्यावर आलेले संकट दूर व्हावे व आपल्याला पुन्हा वैभव प्राप्त व्हावे म्हणून सतत चौदा वर्षे चौदा गाठी असलेले रेशमी दोरा अनंत मानून त्याची पूजा करून हे व्रत पूर्ण करतात. आपल्या सणावारांचा प्रारंभ प्रतिवर्षी नागपंचमीपासून होतो आणि त्यातील एक पर्व अनंत चतुर्दशीला संपते. अनंत हे एका महानागाचे नाव असले आणि हे नाव जपणे पुण्यकारक मानले जात असले तरी अनंत हे विष्णुचे नाव आहे, हे नजरेआड करता नये. अनंत चतुर्दशीच्या दिवशी विष्णुची 'अनंत' ह्या नावाने पूजा केली जाते. अनंत चतुर्दशीचे व्रत खूप घरातून पाळले जाते. १४ प्रकारची फुले, १४ प्रकारची फळे, १४ प्रकारची धान्ये आणि १४ प्रकारचे नैवेद्य दाखवून एका दोरकासह अनंताची पूजा केली जाते. हा दोरक म्हणजे दोरा अनंत म्हणूनच ओळखला जातो.

हा उजव्या हाताच्या मनगटावर बांधतात आणि तो सर्वप्रकारच्या संकटापासून रक्षण करतो, अशी श्रद्धा असते. ह्या व्रताचा विशेष असा की, ही पूजा झाल्यानंतर विसर्जन मागाहून दुस-या दिवशी किंवा गणपती पूजेप्रमाणे दोन, पाच दिवसांनी अशाप्रकारे न करता त्याच दिवशी पूजेनंतर काही वेळाने करण्याची रुढी आहे. हे अनंताचे व्रत १४ वर्षे आचरावे असे सांगितलेले असले तरी अनेक लोक ते आजन्म पाळत असतात. ह्या व्रताची कथा सत्यनारायणाच्याकथेसारखीच आहे. म्हणजे कोणी अडचणीत सापडला असता त्याला दुस-या कोणी तरी अनंताचे व्रत करण्यास सांगितले आणि त्यामुळे त्याचे दुःख निवारण झाले. पुढे तो हे व्रताचरण विसरला आणि त्याच्यावर घोर आपत्ती आल्या, अशा स्वरुपाच्या या व्रताच्या कथा आहेत. नेहमीप्रमाणे ह्या कथेचाही नायक एक ब्राह्मण आहे. त्याच्या




पत्नीने एका कन्येला जन्म दिला, तिचे नाव शीला! तिच्या जन्मानंतर ब्राह्मणाची पत्नी दिवंगत झाली. सुमंतुने म्हणजे त्या ब्राह्मणाने दुसरा विवाह केला. ती पत्नी अतिशय कर्कशा होती. पुढे ह्या शीलेचा विवाह कौंडिण्य ऋषीशी झाला. 'निरोप देताना जावयाला काहीतरी देऊ या,' असे सुमंतुने म्हटल्यावर त्याची कर्कशा पत्नी आडवी आली. तिने सुमंतुला ते देऊ दिले नाही. उलट जावयाला आणि लेकीलाही दुरुत्तरे केली. ती पतीबरोबर सासरी जात असताना वाटेत एकेठिकाणी काही स्त्रिया अनंताचे व्रत आचरित असताना तिला दिसल्या. त्या स्त्रियांकडे शीलेने व्रताची चौकशी केली आणि ती त्या दिवसापासून ते व्रत आचरु लागली. व्रताच्या प्रभावाने तिला म्हणजे कौंडिण्याला वैभवाचे दिवस आले. तो खूप श्रीमंत झाला आणि त्याला श्रीमंतीची धुंदी चढली.

एके दिवशी त्याने शीलेच्या हातातील अनंताचा दोर तोडून टाकला आणि त्यामुळे अनंत त्याच्यावर रागावला. कौंडिण्याचे सर्व वैभव गेले. त्याला पश्चाताप झाला आणि मग त्याच्या सहनशीलतेचा अंत पाहून अनंताने ब्राह्मणरुपात त्याला दर्शन दिले आणि पुन्हा व्रताचरण करण्यास सांगितले. त्यामुळे कौंडिण्याला पुन्हा वैभव प्राप्त झाले. ही कथा साधारणपणे आपल्या सत्यनारायणाच्याकथेशी मिळतीजुळती असली तरी सत्यनारायणाच्यापूजेपेक्षा हे व्रत खूपच प्राचीन आहे यात शंका नाही. सत्यनारायणाची पूजा ही आपल्याकडे अलीकडे आली. अनंत चतुर्दशीचे महत्त्व अधिक वाढविणारा योग म्हणजे गणेशोत्सवातील मूर्तीचे विसर्जन सगळीकडे थाटामाटात केले जाईल. जलाशयात मूर्ती विसर्जित करावयाच्या असा धर्मनियम असल्यामुळे समुद्र, नद्या, विहिरी अशा ठिकाणी गणेशभक्त वाजतगाजत जाऊन मूर्तीचे विसर्जन करतात. सगळीकडे आनंदाचा जल्लोष चालू असतो आणि अशा जल्लोषामुळे अनंत चतुर्दशी हा अनंताच्या व्रताचा दिवस आहे, ही गोष्ट फारशी कोणाच्या ध्यानातच येत नाही. गणपतीबाप्पा मोरया पुढच्या वर्षा लवकर या....!

## गणेश विसर्जन का करावे :-

गणेशजींनी सलग १० दिवस महाभारत लिहिले होते. एका जागी बसल्यामुळे त्यांचे शरीर उष्णतेने जळू लागले होते. हे ज्यावेळी व्यास ऋषींनी पाहिले त्यानंतर वेद व्यासजींनी त्यांना एका जलस्त्रोतावर नेले आणि तेथे पाण्यात स्नान केले. त्यामुळे गणेशजींना मोठा आराम मिळाला. त्या दिवशी अनंत चतुर्दशी होती. त्या दिवसापासून या तिथीला गणेशजींचे विसर्जन करण्याची प्रथा आहे. ज्ञान, बुद्धीची देवता, आणि पाणी, हे देखील ज्ञान आणि शहाणपणाशी संबंधित असल्याचे मानले जाते, याचे कारण स्वतः गणपती बाप्पा आहेत. गणपती बाप्पाची मूर्ती पाण्यात विसर्जित केल्याने, भगवान गणेश शरीरापासून निराकारात विरघळतात. पाणी हे पाच तत्वांपैकी एक मानले गेले असल्यामुळे, ज्यामध्ये प्राणप्रतिष्ठेने स्थापन केलेली गणेशाची मूर्ती मूळ स्वरूपात पाच तत्वांमध्ये विरघळते आणि विलीन होते. असे मानले जाते की, श्री गणेशाने महाभारत लिहिले होते. महर्षी वेद व्यास यांनी सलग १० दिवस गणेशाला महाभारताची कथा सांगितली आणि गणेशाने ही कथा अगदी १० दिवसात लिहून काढली. १० दिवसानंतर वेद व्यासजींनी गणेशजींना स्पर्श केला, त्यावेळी त्यांच्या शरीराचे तापमान खूप वाढले असल्याचे त्यांना दिसले. वेदव्यासजींनी त्यांना ताबडतोब जलकुंभावर नेले आणि तेथे पाण्यात स्नान केले आणि शरीराचे तापमान शांत केले. त्यावेळी श्री गणेशजींना आराम मिळाला. तेव्हापासून असे मानले जाते की, गणेशाचे विसर्जन त्यांना थंड करण्यासाठी आराम मिळण्यासाठी केले जाते. जीवन हे मृत्यूचे एक चक्र आहे. विसर्जनाचा नियम असे सांगतो की, जग एका चक्राच्या रूपाने फिरत असते, हे माणसाला समजले पाहिजे. या पृथ्वीतलावर जी काही जीवसृष्टी आलेली आहे, ती जीवसृष्टी परत आपल्या जागी जाते. आणि मग जेव्हा वेळ येते त्यावेळी ती पृथ्वीवर परत येते. असे कालचक्र सुरू असते. आपण मोठ्या प्रेमाने बाप्पाची मुर्ती घरी आणतो, नंतर आपण त्याच्या मूर्ती स्वरुपाने मंत्रमुग्ध होतो, पण त्याला जायचे आहे, म्हणजेच गणपती विसर्जन म्हणून त्याचा मोह सोडावा लागतो.



## गणेश विसर्जनाची पद्धत :-

विसर्जनाच्या दिवशी सकाळी नियमितपणे बाप्पाची पूजा करावी. दुपारी आरती ,नैवेद्य दाखवून त्यानंतर संध्याकाळी पुनः पूजा करून शुभ मुहूर्तावर गणरायाला निरोप द्यावा. विसर्जनास न्यायच्यावेळी मूर्ती एखाद्या लाकडी पाटावर ठेवावी. पाटावर ठेवताना आधी रंगोली काढावी. त्यावर पिवळे किंवा लाल रंगाचे कापड पसरून त्यावर स्वस्तिक काढावे. त्यानंतर गणपती बाप्पाला ढोल-ताशांच्या गजरात आनंदाने नदीच्या काठावर,समुद्रावर किंवा तलावाच्या काठावर घेऊन जा. तेथे बाप्पाची पुन्हा आरती करा आणि आपल्या मनोकामना पूर्ण होण्यासाठी त्यांच्याकडून आशीर्वाद घ्यावा. आणि बाप्पाला सांगावे, की या वर्षी येऊन तुम्ही ज्या प्रकारे आमच्या आयुष्यात आनंद दिलात, तशाच प्रकारे पुढच्या वर्षीही आमच्या घरी या आणि आमच्याकडून आपली सेवा घडवून आणा. पूजा अर्चा करताना झालेल्या चुकांबद्दल माफी मागावी. नंतर गणपती बाप्पा मोरया च्या जयघोषात मूर्ती पाण्यात विसर्जित करावी. भगवान गणेशाच्या जन्मचक्राला सूचित करण्यासाठी हा विधी केला जातो. तो मातीपासून/पृथ्वीपासून निर्माण झालेला त्याचा प्रतीकात्मक पुतळाही आहे. त्यामुळे मूर्ती पाण्यात विसर्जित केली जाते. जेणेकरून गणेश भक्तांच्या घरी किंवा मंदिरात ज्या ठिकाणी गणेश चतुर्थीचा विधी आयोजित केला जातो त्या ठिकाणी 'मुक्काम' केल्यानंतर गणेश आपल्या घरी परत जाईल. हिंदू धर्मात गणेशाला बुद्धीची, ज्ञानाची देवता मानतात. सर्व शुभ कार्यात प्रथम गणपतीची पूजा करतात. कारण तो सुखकर्ता, दुखहर्ता, विघ्नहर्ता आहे. म्हणूनच संकटनाशक देव म्हणून ओळखला जाणारा गणेश, अडथळे दूर करणारा म्हणूनही पूजला जातो . गणेशमूर्ती विसर्जनासाठी बाहेर काढल्यावर घरातील विविध अडथळेही दूर होतात आणि विसर्जनासोबतच हे विघ्नही नष्ट होतात, असा समज आहे. म्हणून गणपती विसर्जन करणे चांगले समजले जाते. सलग १० दिवस महाभारताचे लिखाण करताना श्री गणेशाच्या शरीराचे तापमान खूप वाढले होते.

थायलंडचा धुव्वा उडवला

## आशिया चषक स्पर्धेत थायलंडविरुद्ध ११ गोल

# महिला हॉकी संघाची दणदणीत सलामी!

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**भारतीय महिला हॉकी संघाने आशिया चषक स्पर्धेला शुक्रवारी थाटात सुरुवात केली. काही प्रमुख खेळाडूंच्या अनुपस्थितीतही भारतीय संघाने पहिल्या सामन्यात थायलंडचा ११-० असा धुव्वा उडवला. भारताकडून उदिता दुहान (३०, ५०व्या मिनिटाला) आणि ब्युटी डुंगडुंग (४५, ५४व्या मि.) यांनी प्रत्येकी दोन गोल केले. मुमताज खान (सातव्या मि.), संगीता कुमारी (१०व्या मि.), नवनीत कौर (१६व्या मि.), लालरेमसियामी (१८व्या मिनिट), थौदाम सुमन देवी (४९व्या मि.), शर्मिला देवी (५७व्या मि.) आणि ऋतुजा पिसाळ (६०व्या मि.) या अन्य खेळाडूंनी एकेक गोल केला..**

## भारताने अधिक दृढनिश्चयाने खेळ केला




भारतीय महिला खेळाडूंनी सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. पहिल्या अठरा मिनिटांत चार आणि पूर्वार्धाच्या अखेरच्या मिनिटाला एक असे पाच गोल करून मध्यंतरालाच भारताने ५-० अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात अखेरच्या पंधरा मिनिटांत भारताने सहा गोल करून मोठ्या विजयावर शिक्कामोर्तब केले. भारताच्या खेळात कमालीची अचूकता होती. भारताने नऊ पेनल्टी कॉर्नर मिळविले आणि पाचवर त्यांनी गोल केले. प्रतिस्पर्धी थायलंडला त्यांनी एकही कॉर्नर मिळू दिला नाही.भारतीय संघ अनुभवी गोलरक्षक सविता पुनिया आणि 'ड्रॅगफ्लिकर' दीपिका या दोन प्रमुख खेळाडूंशिवाय खेळत आहे. भारताचा आता शनिवारी जपानशी सामना होईल.राजगीर (बिहार) – एका पावलावर असलेला अंतिम फेरीतील प्रवेश निश्चित करण्यासाठी भारतीय पुरुष संघ आज, शनिवारी आशिया चषक हॉकी स्पर्धेतील 'अव्वल चार' फेरीमध्ये चीनशी खेळणार आहे. या फेरीत भारताविरुद्धची बरोबरी आणि चीनविरुद्धच्या पराभवामुळे गतविजेत्या कोरियाचे आव्हान संपुष्टात आले आहे. आता गटातील पहिल्या दोन क्रमांकांसाठी भारत, चीन, मलेशिया संघांमध्ये चुरस आहे. भारताचे दोन सामन्यांत चार गुण झाले असून, चीन, मलेशियाचे प्रत्येकी तीन गुण आहेत. त्यामुळे भारताला रविवारी होणाऱ्या अंतिम फेरीच्या सामन्यात प्रवेश करण्यासाठी चीनविरुद्ध बरोबरीही पुरेशी ठरणार आहे.कोरियाविरुद्ध दमदार कामगिरी केल्यानंतर भारताने मलेशियाविरुद्ध अधिक जिद्द आणि दृढनिश्चयाने खेळ केला. आता चीनविरुद्ध अष्टपैलू कामगिरी करून भारत अंतिम फेरीच्या प्रवेशावर शिक्कामोर्तब करण्याच्या इराद्यानेच उतरेल यात शंका नाही पहिल्या अठरा

### भारताच्या खेळात कमालीची अचूकता

भारतीय महिला खेळाडूंनी सुरुवातीपासूनच वर्चस्व राखले. पहिल्या अठरा मिनिटांत चार आणि पूर्वार्धाच्या अखेरच्या मिनिटाला एक असे पाच गोल करून मध्यंतरालाच भारताने ५-० अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात अखेरच्या पंधरा मिनिटांत भारताने सहा गोल करून मोठ्या विजयावर शिक्कामोर्तब केले. भारताच्या खेळात कमालीची अचूकता होती.

मिनिटांत चार आणि पूर्वार्धाच्या अखेरच्या मिनिटाला एक असे पाच गोल करून मध्यंतरालाच भारताने ५-० अशी आघाडी घेतली होती. उत्तरार्धात अखेरच्या पंधरा मिनिटांत भारताने सहा गोल करून मोठ्या विजयावर शिक्कामोर्तब केले. भारताच्या खेळात कमालीची अचूकता होती. भारताने नऊ पेनल्टी कॉर्नर मिळविले आणि पाचवर त्यांनी गोल केले. प्रतिस्पर्धी थायलंडला त्यांनी एकही कॉर्नर मिळू दिला नाही.भारतीय संघ अनुभवी गोलरक्षक सविता पुनिया आणि 'ड्रॅगफ्लिकर' दीपिका या दोन प्रमुख खेळाडूंशिवाय खेळत आहे. भारताचा आता शनिवारी जपानशी सामना होईल.राजगीर (बिहार) – एका पावलावर असलेला अंतिम फेरीतील प्रवेश निश्चित करण्यासाठी भारतीय पुरुष संघ आज, शनिवारी आशिया चषक हॉकी स्पर्धेतील 'अव्वल चार' फेरीमध्ये चीनशी खेळणार आहे. या फेरीत भारताविरुद्धची बरोबरी आणि चीनविरुद्धच्या पराभवामुळे गतविजेत्या कोरियाचे आव्हान संपुष्टात आले आहे.भारताचे दोन सामन्यांत चार गुण झाले असून, चीन, मलेशियाचे प्रत्येकी तीन गुण आहेत. त्यामुळे भारताला रविवारी होणाऱ्या अंतिम फेरीच्या सामन्यात प्रवेश करण्यासाठी चीनविरुद्ध बरोबरीही पुरेशी ठरणार आहे.कोरियाविरुद्ध दमदार कामगिरी केल्यानंतर भारताने मलेशियाविरुद्ध अधिक जिद्द आणि दृढनिश्चयाने खेळ केला. आता चीनविरुद्ध अष्टपैलू कामगिरी करून भारत अंतिम फेरीच्या प्रवेशावर शिक्कामोर्तब करण्याच्या इराद्यानेच उतरेल यात शंका नाही.

# अर्जेंटिनाच्या विजयात निर्णायक भूमिका

## घरच्या प्रेक्षकांसमोरील अखेरच्या लढतीपूर्वी मेसी भावुक

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**कारकीर्दीत अखेरच्या टप्प्यावर असलेला अर्जेंटिनाचा वलयांकित फुटबॉलपटू लिओनेल मेसीने गुरुवारी विश्वचषक पात्रता स्पर्धेत व्हेनेझुएलावरील ३-० अशा विजयात दोन गोल करून घरच्या प्रेक्षकांचा भावनिक निरोप घेतला. लढतीला सुरुवात होण्यापूर्वी सरावादरम्यान मेसी भावुक झाला होता. त्याला अश्रूही अनावर झाले, पण याचा त्याच्या खेळावर विपरीत परिणाम झाला नाही.**




मेसीची फुटबॉल कारकीर्द पुढील वर्षीच्या विश्वचषकापर्यंत कायम राहणार आहे. मात्र, मायदेशातील त्याचा हा अखेरचा सामना होता. "अशी कामगिरी करणे माझे स्वप्न होते. मी या मैदानावर अनेक गोष्टी अनुभवल्या आहेत. मायदेशात घरच्या प्रेक्षकांसमोर खेळणे हे कायमच आनंददायी आणि वेगळा अनुभव देणारे असते," असे मेसी म्हणाला. मेसीला निरोप देण्यासाठी एस्टाडिओ मोन्युमेंटल मैदानावर चाहत्यांनी प्रचंड गर्दी केली होती. मायदेशातील अखेरचा सामना असला, तरी फुटबॉल कारकीर्द इतक्यात संपविणार नसल्याचे मेसीने संकेत दिले. विश्वचषक २०३०च्या पात्रता फेरीचे सामने २०२७ मध्ये सुरू होतील, तेव्हा मेसी ४० वर्षांचा असेल. पुढील वर्षीचा विश्वचषक खेळणे हे आपले उद्दिष्ट असल्याचे मेसी म्हणाला. मात्र, त्यानंतर काय होणार हे सांगू शकत नाही, असे त्याने स्पष्ट केले. यापूर्वीच विश्वचषक पात्रता सिद्ध केलेल्या अर्जेंटिनासाठी मेसीने ३९ आणि ८०व्या मिनिटाला, तर लौटारो मार्टिनेझने ७६व्या मिनिटाला गोल केला. व्हेनेझुएला प्रथमच विश्वचषक खेळण्यासाठी उत्सुक असून, त्यांचे १८ गुण झाले आहेत.

### पात्रता मिळविलेले संघ

त्यांचा सातवा क्रमांक असून, आंतरखंडीय 'प्ले-ऑफ'मध्ये खेळण्याची त्यांना संधी आहे.अन्य पात्रता फेरीच्या सामन्यात उरुग्वेने पेरुचा ३-०, कोलंबियाने बोलिव्हियाचा ३-० असा पराभव केला. पॅराग्वे आणि इक्वेडोर यांच्यातील लढत गोलशून्य बरोबरीत सुटली.पुढील वर्षीच्या 'फिफा' विश्वचषक स्पर्धेसाठी यजमान म्हणून अमेरिका, मेक्सिको, कॅनडा यांनी आपोआप पात्रता मिळविली आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

। शनिवार।

। दि. 6 सप्टेंबर 2025।

## तंत्रज्ञान विकासामुळे समाजोन्नती व लोककल्याणाला चालना

# जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रात भारतासाठी अमर्याद संधी!

### प्रा. राव तुमाला यांचे प्रतिपादन : 'आयसीसीयुबीईए-25' आणि 'आयमेस-25'

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज




**भारतातील विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्राने मागील दशकात झपाट्याने प्रगती केली असून, कृत्रिम बुद्धिमत्ता, नवकल्पना, निर्मिती आणि उत्पादन यांचा कुशलतेने वापर केला जात आहे. त्यामुळे जागतिक स्तरावर भारताला तंत्रज्ञान क्षेत्रात अमर्याद संधी उपलब्ध होत आहेत, असे स्पष्ट मत मायक्रो इलेक्ट्रॉनिक पॅकिंग इनोव्हेशन्सचे पुरस्कर्ते प्रा. राव तुमाला यांनी व्यक्त केले.**

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट (पीसीईटी) संचालित निगडी येथील पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (पीसीसीओई) मध्ये नवव्या 'आयसीसीयुबीईए-२५' (ICCUBEA-25) आणि चौथ्या 'आयमेस-२५' (IMES-25) या दोन आंतरराष्ट्रीय परिषदेचे भव्य उद्घाटन प्रा. राव तुमाला यांच्या हस्ते संपन्न झाले. ही दोन दिवसीय परिषद 'संगणन, संप्रेषण, नियंत्रण व ऑटोमेशन' तसेच 'यांत्रिक अभियांत्रिकीतील नवकल्पना' या विषयांवर केंद्रित असून, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, सादरीकरण व चर्चा यातून विद्यार्थी आणि संशोधकांना मौल्यवान ज्ञानसंपदा लाभणार आहे.

**वैज्ञानिक संवादाचे उत्तम व्यासपीठ – डॉ. बुचडे**

या प्रसंगी आयईईई (IEEE) पुणे विभागाचे प्रमुख डॉ. अमर बुचडे यांनी मार्गदर्शन करताना सांगितले की, "तंत्रज्ञानाचा उपयोग समाजाच्या सेवेकरिता व्हावा, यासाठी संशोधन, संवाद आणि नवकल्पनांना चालना देणे गरजेचे आहे. ही परिषद त्यासाठी उत्तम व्यासपीठ ठरणार आहे."

१२४० प्रवेशिकांमधून ३३४ निवडक निबंधांची सादरीकरणासाठी निवड या परिषदेसाठी भारतासह तब्बल १६ देशांमधून १२४० संशोधन प्रवेशिका प्राप्त झाल्या. त्यापैकी 'आयसीसीयुबीईए'साठी २१४, तर 'आयमेस'साठी १२० शोध निबंधांची निवड करण्यात आली असल्याची माहिती अनुक्रमे परिषदांच्या जनरल चेअर डॉ. जयश्री कट्टी व डॉ. नरेंद्र देवरे यांनी दिली.

संशोधनासाठी आंतरराष्ट्रीय व्यासपीठ – डॉ. गोविंद कुलकर्णी

पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी म्हणाले, "या परिषदेमुळे तरुण संशोधकांना त्यांच्या कल्पनांना जागतिक व्यासपीठ मिळते. यामुळे जागतिक स्तरावर संशोधकांशी संपर्क वाढतो व नाविन्यपूर्ण संशोधनाला चालना मिळते."

**उत्कृष्ट आयोजन, मान्यवरांची उपस्थिती**

प्रा. राव तुमाला, डॉ. अमर बुचडे यांच्यासह पीसीसीओईचे उपसंचालक डॉ. नीलकंठ चोपडे, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, 'आयसीसीयुबीईए-२५'चे डॉ. जयश्री कट्टी, 'आयमेस-२५'चे डॉ. नरेंद्र देवरे, तसेच विविध देशांतील प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिषदेसाठी विशेष स्मरणिकेचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन डॉ. अंजली श्रीवास्तव व डॉ. संदीप पाटील यांनी केले. आभार प्रदर्शन डॉ. स्वाती जगताप यांनी केले. पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, तसेच हर्षवर्धन पाटील, नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर यांनी उपस्थित राहून प्रतिनिधींचे स्वागत केले व परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी शुभेच्छा दिल्या.

## गणेशोत्सव: टाकाऊ वस्तूंमधून साकारला सुंदर गणपती

### केंब्रिज चॅम्प्स इंटरनॅशनल प्री स्कूल कृष्णानगरच्या चिमुकल्यांची कौतुकास्पद कलाकृती

। पिंपरी-चिंचवड:। प्रतिनिधी : महाईन्यूज

**केंब्रिज चॅम्प्स इंटरनॅशनल प्री स्कूल, कृष्णानगर ब्रांच येथील दोन ते सहा वर्षे वयोगटातील चिमुकल्यांनी आपल्या कल्पकतेचे व कलागुणांचे प्रत्यंतर देत टाकाऊ वस्तूंमधून सुंदर अशी गणपती बाप्पाची मूर्ती साकारली.**



झाडू, रबर, काठ्या, बाहुली, कापूस, खराब झालेले थर्माकोल यांसारख्या घरगुती टाकाऊ वस्तूंचा वापर करून मुलांनी गणेशमूर्ती साकारल्या. या उपक्रमातून 'वेस्ट टू बेस्ट' ही संकल्पना प्रत्यक्षात उतरवून पर्यावरण संवर्धनाचा संदेशही देण्यात आला. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे उद्घाटन कृष्णानगर प्रभागातील नागरिकांसाठी करण्यात आले. उपस्थित सर्व पालक व नागरिकांनी चिमुकल्यांच्या कलाकृतींचे मनापासून कौतुक केले.

कार्यक्रमाला शाळेच्या चेअरमन सौ. कीर्ती मारुती जाधव, तसेच संपूर्ण शिक्षकवृंद उपस्थित होता. सौ. जाधव यांनी आपल्या भाषणात लहान वयातच मुलांमध्ये निर्माण होत असलेली कलात्मक जाणीव आणि सामाजिक भान यावर प्रकाश टाकला. हा उपक्रम केवळ मुलांच्या हस्तकलेचे प्रदर्शन न राहता पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्याचा एक प्रेरणादायी मार्ग ठरला.

"चिमुकल्यांमधील सृजनशीलता आणि सामाजिक भान विकसित करणे हेच आमचे मुख्य ध्येय आहे. टाकाऊ वस्तूंमधून तयार केलेल्या या सुंदर गणेशमूर्ती फक्त कला नाही, तर पर्यावरणप्रेमाचेही प्रतीक आहेत. अशा उपक्रमांमधून मुलांचा सर्वांगीण विकास साधता येतो."

## शिक्षण विश्व: पीसीईटी शैक्षणिक संकुलात नवव्या 'आयसीसीयुबीईए

# पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने 23 शिक्षकांचा सन्मान

## शिक्षण विश्व: आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा उत्साहात

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिक्षक दिनाचे औचित्य साधून पिंपरी चिंचवड महापालिकेच्यावतीने विविध शाळांतील २३ आदर्श शिक्षकांचा गौरव करण्यात आला. चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात झालेल्या या पुरस्कार वितरण सोहळ्यास आमदार अमित गोरखे, अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, प्रशासन अधिकारी तृप्ती सांडभोर आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.**




या सोहळ्यात महापालिकेचे सहाय्यक आयुक्त किरणकुमार मोरे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, प्रशासन अधिकारी संगीता बांगर, सहाय्यक प्रशासन अधिकारी रजिया खान यांच्यासह विविध शाळांचे मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**"शाळा म्हणजे भविष्यासाठीचा पाया" – आमदार अमित गोरखे**

यावेळी बोलताना आमदार अमित गोरखे यांनी शिक्षकांच्या कार्याचे कौतुक करताना म्हटले, "शिक्षक समाजाच्या घडणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. माझी जडणघडण महापालिका शाळेतच झाली असून त्यामागे माझ्या शिक्षकांचे अमूल्य योगदान आहे." अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील म्हणाले, "शाळा म्हणजे मुलांच्या भविष्यासाठीचा भक्कम पाया असून, तो पाया मजबूत करण्याचे कार्य आपले शिक्षक समर्पणाने करत आहेत."

**आयुक्तांचा व्हिडिओ संदेश...**

महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी शिक्षक दिनानिमित्त दिलेल्या व्हिडिओ संदेशात म्हटले, "शिक्षक म्हणजे केवळ ज्ञानदाते नाहीत, तर विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा देणारे शिल्पकार आहेत. आपल्या शाळा ही शिक्षणाचे केंद्र न राहता भावी पिढी घडविण्याचे मंदिर व्हावे, हा आमचा प्रयत्न आहे."

**सन्मानित शिक्षकांची यादी**

यंदा आदर्श शिक्षक पुरस्कारासाठी बालवाडी, प्राथमिक, माध्यमिक तसेच खासगी शाळांतील शिक्षकांचा समावेश करण्यात आला. क्रीडा शिक्षक भाऊसाहेब व्यंकट खैरे, जाधववाडीच्या जितेंद्र कराड आणि आबासाहेब पाळवंदे यांना विशेष पुरस्कार देण्यात आले.

**बालवाडी विभाग:**

सविता मांडेकर (थेरगाव)
नसरीन बानो मोहम्मद सुलतान (उर्दू शाळा, थेरगाव)
वैशाली साकोरे (मोशी)

**प्राथमिक विभाग:**

प्रियंका गावडे, सुभांगी भोंडवे (मोशी, पीसीएमसी)
प्रदीप घुटे (दिघी)
स्वाती शिंदे (भोसरी)
कांचन घोडे (मोशी)
विश्वलता मोरे (चिखली)
मारुती खामकर (कुदळवाडी)
चित्रा शेवकरी (पिंपळे गुरव)
उस्ताद बिबिहाज्रा जंगबहादूर (थेरगाव उर्दू)

**माध्यमिक विभाग:**

प्रिया नांगरे (पिंपळे गुरव)
वैशाली मामुल्वार, राजश्री

---

# सामाजिक कार्यातून प्रेरणा देणारे मंडळ

## श्री म्हसोबा देवस्थान मित्र मंडळ, हुतात्मा चौक, भोसरी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्री म्हसोबा देवस्थान मित्र मंडळ, हुतात्मा चौक, भोसरी हे मंडळ गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक कार्याची परंपरा जपत विविध समाजोपयोगी उपक्रम राबवत आहे. उत्सवाच्या काळात केवळ धार्मिक कार्यक्रमांवर भर देता, समाजात सकारात्मक बदल घडवण्यासाठी कार्यरत आहे.**



या मंडळातर्फे दरवर्षी रक्तदान शिबिर, मोफत आरोग्य तपासणी, नेत्र तपासणी, शैक्षणिक साहित्य वाटप, स्वच्छता मोहीम अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यावर्षी देखील गणेशोत्सवाच्या निमित्ताने पर्यावरणपूरक मूर्ती प्रतिष्ठापना, प्लास्टिकविरोधी जनजागृती आणि वृक्षारोपण या उपक्रमांना प्राधान्य देण्यात आले आहे. मंडळाच्या कार्यामुळे स्थानिक तरुणांमध्ये सामाजिक जाणिवा वाढीस लागल्या आहेत. मंडळाच्या पुढाकाराने अनेक गरजू विद्यार्थी आणि नागरिकांना आवश्यक ती मदत मिळाली आहे. दर्शन भुजबळ, किरण भालेकर, आयुष बाणेकर, तेजस गायकवाड हे मंडळाचे कार्यकर्ते आहेत.

Pune District Education Association's
**Seth Govind Raghunath Sable**
**College of Pharmacy**
**Saswad, Pune - 412301**
**D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.**

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

**Your Trusted Facilitation Centre!**

**FC Code 6372**

Important Note:
- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

**"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"**

**Confirm Your Application Now!**



Visit Us for Physical Scrutiny
PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad
Timings: 10:00 AM – 5:00 PM (including Saturday & Sunday)
Contact: Dr. Nilesh Bhosale – 9860503549

## हलता देखावा भक्तांच्या मनाला भावणारा ठरला

# घरगुती गणेशोत्सवात पारंपरिक भक्तीचा अनोखा देखावा!

## देखाव्यातून साकारला सोमवती पालखी सोहळा

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**घरगुती गणेशोत्सवात पारंपरिक भक्तीचा अनोखा देखावा पाहायला मिळाल. मल्हार भक्त सुधीर लांडगे यांनी सोमवती पालखी सोहळा गणेश देखाव्यातून साकारला. पारंपरिक पद्धतीने साकारलेला हा हलता देखावा भक्तांच्या मनाला भावणारा ठरला.**



मल्हारभक्तांच्या परंपरेला अनुसरून सजवलेला हा सोहळा अतिशय बारकाईने आणि श्रद्धेने साकारण्यात आला आहे. यात पालखीचा उभार, नादांनी भारलेली भक्तीमय रचना, आणि संपूर्ण सोहळ्याची हलती अनुभूती देणारे घटक पाहायला मिळतात.

या देखाव्याची संकल्पना आणि साकारकर्ता मल्हारभक्त सुधीर लांडगे यांची होती. त्यांनी आपल्या कलेतून केवळ देखावा साकारलेला नाही, तर एक संपूर्ण आध्यात्मिक अनुभव उभा केला आहे. घरगुती गणपतीसाठी तयार केलेल्या या डेकोरेशनमध्ये पारंपरिकतेचा भास होताच, पण त्यासोबतच भक्तीभाव, निसर्ग आणि सामाजिक जागर यांचे सुंदर मिलन झाले आहे. पाहणाऱ्यांना भक्तिमय वातावरणात घेऊन जाणारा हा देखावा अनेकांचे लक्ष वेधून घेतले.

## उत्साह, शिस्त आणि सामाजिक बांधिलकी यांचा संगम

### जय महाराष्ट्र तरुण मित्र मंडळ, आळंदी रोड उत्साही सहभागामुळे आणि सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेमुळे विशेष लक्ष वेधून घेतेय

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**आळंदी रोडवरील जय महाराष्ट्र तरुण मित्र मंडळ हे गणेशोत्सवात आपल्या उत्साही सहभागामुळे आणि सामाजिक बांधिलकीच्या भूमिकेमुळे विशेष लक्ष वेधून घेत आहे. मंडळातील युवा कार्यकर्त्यांनी संयोजन, शिस्त आणि विविध उपक्रमांतून गणेशोत्सव अधिक समृद्ध केला आहे.**



मंडळाने पर्यावरणपूरक सजावट आणि मूर्तींच्या माध्यमातून पर्यावरणसंवर्धनाचा संदेश दिला. या सर्व उपक्रमांत मंडळाचे अभिषेक जाधव, शुभम बढे आणि राहुल बर्डे यांनी विशेष पुढाकार घेतला. या तरुण कार्यकर्त्यांच्या संघटन क्षमतेमुळे मंडळाचा उत्सव शिस्तबद्ध आणि प्रेरणादायी झाला. मंडळाच्या कार्यक्रमांना परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

“गणपती बाप्पा हे एकत्रित येण्याचे निमित्त आहे, आणि या माध्यमातून समाजासाठी काहीतरी चांगले करणे हेच आमचे ध्येय आहे,” असे मंडळाच्या कार्यकर्त्यांनी सांगितले. जय महाराष्ट्र तरुण मित्र मंडळाचा हा सहभाग इतर मंडळांसाठीही आदर्शवत ठरत आहे.

## शिक्षक दिन वर्षातील सर्व 365 दिवस साजरा व्हावा

# गुणवत्तापूर्ण शिक्षण हेच ध्येय असावे - डॉ दीपक शहा

### शिक्षण विश्व: आर्टिफिशियल इंटेलिजन्सबाबत शिक्षकांना डॉ. शैलेश गुजर यांच्याकडून मार्गदर्शन




। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**शिक्षक दिन केवळ एक दिवस नव्हे, तर वर्षातील सर्व ३६५ दिवस साजरा व्हावा, असे मत कमला एज्युकेशन सोसायटीच्या प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संस्थापक सचिव डॉ दीपक शहा यांनी व्यक्त केले.**

चिंचवड येथील संस्थेच्या प्रांगणात शिक्षक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी विविध क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन, गुणवंत प्राध्यापकांचा सत्कार तसेच विद्यार्थ्यांनी शिक्षकाची भूमिका साकारून कार्यक्रमात रंग भरले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ शहा होते. प्रमुख वक्ते म्हणून आयुर्वेदाचार्य डॉ शैलेश गुजर यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी व्यासपीठावर शिक्षणतज्ञ धनंजय कदम, मुख्य प्रशासकीय अधिकारी डॉ राजेंद्र कांकरिया, संस्थेच्या खजिनदार डॉ भूपाली शहा, संचालिका डॉ तेजल शहा, प्राचार्या डॉ क्षितिजा गांधी, डॉ पौर्णिमा कदम, डॉ वनिता कुऱ्हाडे, वृंदा जोशी, एमबीए विभागाचे संचालक डॉ सचिन बोरगावे आदी उपस्थित होते.

डॉ शहा पुढे म्हणाले की, प्रतिभा महाविद्यालयाने अल्पावधीतच शहरात स्वतःचा ठसा उमटवला आहे. हे यश येथील प्राध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे आहे. विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत बाह्यजगाची अद्ययावत माहिती मिळावी व त्यांचे सर्वांगीण विकास साधण्यासाठी संस्थेने नेहमीच प्रयत्न केले आहेत.

शिक्षणतज्ञ धनंजय कदम यांनी केंब्रिज कोर्सेस, इंग्रजी भाषेचे महत्त्व आणि त्यावरील प्रभुत्व या विषयांवर सखोल मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांनी जागतिक पातळीवर संवाद साधण्यासाठी इंग्रजीवर प्रभुत्व मिळविण्याचे आवाहन त्यांनी केले. यावेळी डॉ शैलेश गुजर, डॉ दीपक शहा आणि डॉ भूपाली शहा यांच्या हस्ते पीएचडी प्राप्त केलेले डॉ रोहित आकोलकर, डॉ शबाना शेख यांचा तसेच सेट परीक्षा उत्तीर्ण झालेल्या प्रा. प्रीती जगताप आणि प्रा. रूपाली नानकर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. उपस्थित शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना भेटवस्तू देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी शिक्षकांची भूमिका निभावून एक वेगळी शिकवण दिली. तबस्सूम शेख हिने प्राचार्यांची भूमिका यशस्वीरित्या पार पाडली. तिचा सत्कार डॉ राजेंद्र कांकरिया, डॉ क्षितिजा गांधी व डॉ जयश्री मुळे यांनी केला.

प्रसंगी प्रतिभा इंटरनॅशनल स्कूलमध्ये विविध गुणदर्शन कार्यक्रम संपन्न झाला. याचे आयोजन प्राचार्या वृंदा जोशी, उपमुख्याध्यापिका लीजा सोजू व शिक्षिका गुलनाज खान यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सुवर्णा गोगटे यांनी, प्रमुख पाहुण्यांची ओळख प्रा. सुप्रिया गायकवाड यांनी तर आभार प्रदर्शन प्रा. अमोल शिंदे यांनी केले.

#### शिक्षकांनो, स्वतःला सिद्ध करा - डॉ शैलेश गुजर

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलताना डॉ शैलेश गुजर यांनी सांगितले की, कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) हे भविष्याचे तंत्रज्ञान असून, शिक्षण क्षेत्रात त्याचा प्रभाव लवकरच दिसू लागेल. शाळा-महाविद्यालयांमध्ये रोबोट्स शिक्षण देऊ लागतील का, हा प्रश्न उभा राहतो. अशा वेळी जो शिक्षक सतत ज्ञानार्जन करेल, संशोधन करेल व स्वतःला सिद्ध करेल, तोच भविष्यात टिकेल. त्यामुळे शिक्षकांनी वेळेचे भान ठेवत आपले कौशल्य वाढवले पाहिजे, असे ते म्हणाले.

## समाजसेवेच्या कार्यातून परिसरात लौकिक!

### हनुमान मित्र मंडळ, जय महाराष्ट्र चौक, आळंदी रोड, भोसरी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**हनुमान मित्र मंडळ, जय महाराष्ट्र चौक, आळंदी रोड, भोसरी हे केवळ सण-उत्सवांपुरते मर्यादित न राहता समाजोपयोगी कामांतून आपली वेगळी ओळख निर्माण करणारे मंडळ आहे. विविध सामाजिक उपक्रमांमुळे या मंडळाने परिसरात आदर व विश्वास मिळवला आहे.**



गणेशोत्सवाच्या काळात पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर, प्लास्टिकमुक्त मोहिमा आणि शिस्तबद्ध उत्सव आयोजन या गोष्टींचा विशेष अंतर्भाव केला जातो. मंडळाच्या कार्यामुळे परिसरातील नागरिकांमध्ये एक सकारात्मक भावना निर्माण झाली आहे.

विशेषतः तरुण कार्यकर्त्यांचा उत्साह आणि सेवा भाव यामुळे मंडळ सामाजिक परिवर्तनाचा एक घटक बनले आहे.गणेश गोरखनाथ लांडगे, नितीन गजानन साबळे, सुभाष कैलास दौंडकर हे मंडळाचे पदाधिकारी आहेत.


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
SIGMA
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046